# नियमित दरखास्त क्र. २०९/२०१४.

सदाशिव विठु माळी विाा दादासो विठु माळी
CNR No.- MHST070032312014

## निशाणी क्र. ३० व ३४ वरील एकत्रीत आदेश

१. हुकुमनामा धारक यांचा वारस गणेश सदाशिव माळी याने प्रस्तुत अर्ज दाखल केले आहेत. नि.क्र.३० वरील अर्ज विलंब माफ होवुन मिळणेकरिता व नि.क्र. ३४ वरील अर्ज हुकुमनामा धारक व निर्णित ऋणको मयत झाल्याने त्यांच्या वारसदारांची नावे अभिलेखावर घेण्याकरीता परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे. अर्जातील कथन आहे की, वाद मिळकत हुकुमनामाधारक यांच्या वारसांची एकत्र कुटुंबाची मालकी हक्काची आहे. हुकुमनामाधारक सदाशिव विठु माळी हे दि. २२/०१/२०१९ रोजी मयत झाले असुन निर्णित ऋणको नामे दादासो विठ्ठल माळी हे दि. ०१/११/२०२३ रोजी मयत झाले आहेत. हुकुमनामाधारक मयत झाल्यानंतर कुटुंबियांना दुःखातुन लवकर सावरता न आल्यामुळे मृत्युचे दाखले प्राप्त करुन वेळेत वकीलांना माहिती देता न आल्यामुळे विलंब झाला आहे. सबब, हुकुमनामाधारक व निर्णित ऋणको यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करून अबेटमेंट आदेश रद्द करुन त्यांचे कायदेशीर वारस अभिलेखावर घेवून त्याअनुषंगाने दरखास्त अर्जामध्ये आवश्यक ती दुरुस्ती करणेबाबत परवानगी मिळण्याकरिता विनंती केली आहे.

२. हुकूमनामाधारक यांच्या वतीने निशाणी क्र.३० व ३४ वर दाखल अर्जांच्या मागील पृष्ठावर म्हणणे दाखल करून आक्षेप नोंदविला आहे.

३. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. उभय पक्षकारांतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तुतचे अर्ज, त्यावर दाखल म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता पुढील वादप्रश्न विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदिवण्यात येत आहेत;

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अर्ज मंजूर होण्यास पात्र आहेत काय ? | होकारार्थी |
| २) | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येतात. |

:: कारणमिमांसा ::

**वादप्रश्न क्र.१ करीता :–**

५. अभिलेखाचा विचार करता, प्रस्तुत दरखास्त प्रकरण नियमित दिवाणी दावा क्र. २१२/२००७ मधील हुकुमनाम्याच्या अंमलबजावणी करिता दाखल केले आहे. सदर दाव्यामधील मिळकत मौजे काले (चपणेमळा), ता. कराड, जि. सातारा येथील ग्रामपंचायत घर जागा मिळकत असुन न्यायालयाने सदर मिळकतीचा ताबा मुळ प्रतिवादीकडुन मुळ वादीस देणेबाबत आदेशित केले आहे. अभिलेखावर नि.क्र.३३ च्या यादीसोबत निर्णित ऋणको दादु विठ्ठल माळी यांच्या मृत्युप्रमाणपत्राची प्रमाणित प्रत दाखल आहे. त्यावरुन ते दि.०१/११/२०२३ रोजी मयत झाल्याचे स्पष्ट होते. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ०३ किंवा ०४ नुसार वादी किंवा प्रतिवादी मयत झाल्यास दावा अवसान होतो. तथापि, नियम १२ नुसार सदर नियम ३ व ४ मधील तरतुदी हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या अंमलबजावणीतील कार्यवाहीला लागू होत नाहीत. प्रस्तुत दरखास्त प्रकरण, नियमित दिवाणी दावा क्र. २१२/२००७ मधील हुकुमनाम्याच्या अंमलबजावणी संदर्भात आहे. वाद मिळकत स्थावर मालमत्ता आहे. त्यामुळे मी या मतास आलो आहे की, अर्जात नमुद कारण विलंब माफ करुन अबेटमेंट रद्द करण्यास संयुक्तीक आहे. वादाचे स्वरूप पाहता, उभय पक्षकारांमधील वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णित होणे आवश्यक आहे. त्याकरीता, मयत पक्षकाराचे कायदेशीर वारस सामील होवून, उभय पक्षकारांना संधी देणे जरूरीचे आहे. अर्ज मंजूर केल्यास वादाचे निवारण गुणदोषावर होणार आहे. या उलट, अर्ज नामंजूर झाल्यास नियोजित वारसदारांना नैसर्गिक न्याय तत्व नाकारले जावून प्रकरणांची गुंतागुंत वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे मी या मतास आहे की, अर्ज मंजूर होणेस पात्र आहेत. सबब, वादप्रश्न क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवीला आहे.

**वादप्रश्न क्र.२ करीता :–**

६. उपरोक्त ऊहापोह विचारात घेता अर्ज मंजूर होणेस पात्र आहेत. अर्जात नमुद कारण विलंब माफ करण्यास पुरेसे आहे. त्यामुळे खर्चाबाबत आदेश करणे न्यायाचे व योग्य नाही. सबब, मी न्यायाच्यादृष्टीने पुढील आदेश करीत आहे;

**आदेश**

१) हुकुमनामाधारक व निर्णित ऋणको यांचे वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ करुन अबेटमेंट रद्द करुन दरखास्त अर्जामध्ये आवश्यक ती दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेबाबतचे अर्ज निशाणी क्र.

३० व ३४ एकत्रीतपणे मंजूर करण्यात येतात.

२) प्रस्तुत अर्जदाराने हुकूमनामाधारक व निर्णित ऋणको यांच्या वारसदारांची नांवे, दरखास्त अर्जामध्ये नमूद करुन आवश्यक ती दुरुस्ती केल्यानंतर दुरुस्त अर्जाची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2026.08.05 17:13:46 +0530

(अ.अ. उत्पात)

दिनांक :-०५/०८/२०२६.

४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कराड, जि. सातारा.